**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**कार्यपत्रिका क्र. ९**

**सभावृत्तांत**

दिनांक :- ०७/०९/२०२१ वेळ :- सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ७/०९/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुरेश शिवाजी भोईर - अध्यक्ष
२. मा.नामदेव जनार्दन ढाके
३. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
४. मा.करुणा शेखर चिंचवडे
५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
६.मा.राजेंद्र तानाजी गावडे
७.मा.निता विलास पाडाळे
८. मा.विठ्ठल बबन भोईर
९.मा.देविदास जिभाऊ पाटील

याशिवाय क्षेत्रीय अधिकारी श्रीमती सोनम देशमुख, श्री.नितीन देशमुख – कार्यकारी अभियंता, (विद्युत), श्री.अकबर शेख – उप अभियंता, श्री.इंगळे आर एम – उप अभियंता(स्थापत्य), श्री.जावरानी एम टी – उपअभियंता(पाणीपुरवठा), श्री.राजेंद्र जावळे – उप अभियंता (जलनि:सारण), श्री.अकबर शेख-उपअभियंता(विद्युत), श्री.उमेश मोने – उपअभियंता(स्थापत्य),श्री.मोमीन ए ए – कनिष्ठ अभियंता(स्थापत्य उद्यान), , श्री.महादेव शिंदे – सहा.आरोग्याधिकारी, श्री.बटुळे आर एस – कनिष्ठ अभियंता(विद्युत)इत्यादी उपस्थित होते

----------

**मा. सभापती**– सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

दिनांक ३/०८/२०२१ रोजीचा (कार्यपत्रिका क्र.८) सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र. २८ विषय क्र. १
दि. ७/०९/२०२१
सुचक : मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक : मा. नामदेव ढाके
संदर्भ - मा.माधुरी कुलकर्णी यांचे दिनांक २५/०८/२०२१ चे पत्रानुसार

मा.माधुरी कुलकर्णी यांचे दि.२५/०८/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१७ येथील समर्थ कॉलनी दळवी नगर,चिंचवड पुणे ३३ येथे नवीन विरंगुळा केंद्र बांधुन तयार झाले आहे, तरी ते जेष्ठ

नागरीकांना वापरण्यास देण्यासाठी तयार आहे. तरी त्या विरंगुळा केंद्रास माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम असे नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी सदर धोरण निश्चीत होईपर्यंत सदर विषयास मान्यता देता येणार नाही.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सुरेश शिवाजी भोईर]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ /२०२१.
दिनांक : /०९/२०२१

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ / ८८ /२०२१

दिनांक - ८/०९/२०२१

प्रति,

मा.सर्व विभागप्रमुख,
ब क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

दिनांक ७/०९/२०२१ रोजी झालेल्या मासिक सभेमध्ये नगरसदस्यांनी खालीलप्रमाणे आपल्या समस्या मांडल्या, त्यावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा उचित अहवाल उलट टपाली प्रशासन विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय येथे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | मा.नगरसदस्य | उपस्थितीत केलेले प्रश्न | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदेव ढाके (प्रभाग क्र.१७-अ) | १) शिंदे वस्ती कॉर्नर, रावेत ब्लु वॉटर लाईन रस्ता येथे पाणी साचते, यासाठी चारही प्रभागातील रोड चा सर्व्हे करुन पाणी साचणार नाही याची दक्षता घेणे<br>२) सर्व रोडवरील ड्रेनेज चेंबर्स वरील झाकणाच्या बाजुला सिमेंट न वापरता हॉटमिक्स किंवा कोल्डमिक्स वापरणे<br>३) सुखनगरी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम सुरु असुन सदर ठिकाणी विद्युत विभागाचे काम बाकी आहे, असे असतांना विद्युत व स्थापत्य विभागाने समन्वय ठेवुन काम करणे<br>४) प्रभागात अनेक ठिकाणी काही खाजगी पोस्टर्स चिटकवले जातात, त्यामुळे शहर विद्रुपीकरण वाढत आहे त्यामुळे विद्युत पोलवरील तसेच लाल डीपी बॉक्स वरील सर्व स्टीकर्स काढणे व त्यावर देण्यात आलेल्या फोन नंबर्स वरुन सदर स्टीकर्स व पोस्टर्स चिटकवणा-यांवर कारवाई करणे व तसे प्रेस नोट देणे | स्थापत्य<br>बीआरटी<br>आरोग्य<br>अतिक्रमण |
| २ | मा.माधुरी कुलकर्णी (प्रभाग क्र.१७ ब) | १) दळवीनगर, विरंगुळा केंद्र येथील राडारोडा उचलणे<br>२) विद्युत विषयक कामे, एलईडी फिटींग्ज् वेळेत करणे, सर्व स्ट्रीट लाईट्स सुरु असलेबाबत खात्री करणे | स्थापत्य<br>विद्युत |
| ३ | मा.राजेंद्र गावडे | १) प्रभागात काही ठिकाणी खाजगी | आरोग्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | (प्रभाग क्र. १८ ड) | मोकळे प्लॉट आहेत, तेथे काही नागरीक कचरा आणुन टाकतात, अशा खाजगी प्लॉट वरील कचरा काढणेत येऊन प्लॉट धारकास सदर ठिकाणी कुंपण करण्यास सांगावे अथवा दंडात्मक कार्यवाही करणे<br>२) प्रभाग क्र.१८ येथे काही दिवसांपासुन पाणीपुरवठा विस्कळीत झाला असुन पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरळीत करणे.<br>३) लिंक रोड येथील फुटपाथवर अनेक ठिकाणी भाजीवाले व दुकानदार बोर्ड ठेवतात, सदर ठिकाणी अतिक्रमण कारवाई करणे<br>४) लिंक रोड येथील विद्युत विषयक अपुर्ण कामे पुर्ण करणे | पाणीपुरवठा<br>अतिक्रमण<br>विद्युत |
| ४ | मा.अश्विनी चिंचवडे (प्रभाग क्र.१८ क) | १) चाफेकर चौक येथील विद्युत व स्थापत्य विषयक काम संथ गतीने सुरु असुन लाईट फिटींग साठी काम वेळेत पुर्ण करणे.<br>२) पाणीपुरवठा सुरळीत करुन पाण्याचा प्रेशर वाढवणे | |
| ५ | मा.देविदास पाटील (प्रभाग क्र.२२) | १) काळेवाडी बीआरटी रोड येथे भिंत खचली असुन ती केव्हाही पडु शकते, तेथील कामाबाबत बीआरटी विभागाने कधी काम झाले याबाबत अहवाल देऊन सदर काम लवकरात लवकर करणे | बीआरटी |

वरील प्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीचे वेळी घेणेत येईल.

क्षेत्रिय अधिकारी तथा सहा .आयुक्त
ब क्षेत्रिय कार्यालय पिं.चि.मनपा
चिंचवड पुणे ३३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब क्षेत्रिय कार्यालय ,चिंचवड

क्र.बक्षेका/ २ / /२०२१

दिनांक - १६/०७/२०२१

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
ब क्षेत्रिय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय - मा.ब प्रभाग मासिक सभेमध्ये झालेल्या विषयांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत..**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ नुसार प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली असुन सदरच्या समिती या कायद्याने गठीत केलेल्या आहेत. प्रभाग समितीत होणा-या कामकाजाबाबत कार्यवाही करणे हे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी आहे.

ब क्षेत्रिय कार्यालय प्रभाग समिती मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता घेण्यात येते, या सभेत सर्व संबंधित शाखाप्रमुख यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

माननीय सदस्य यांनी आपले विभागाशी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अभ्यासपुर्वक माहिती समिती सभेत देणेत यावी तसेच प्रभाग समितीत झालेल्या सभावृत्तांतातील ठरावांवर नियमाधीन कार्यवाही करणेत यावी. याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडुन कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची स्पष्ट नोंद घ्यावी. दिनांक ६/०७/२०२१ रोजी झालेल्या मासिक सभेमध्ये नगरसदस्यांनी खालीलप्रमाणे आपल्या समस्या मांडल्या, त्यावर लवकरात

लवकर योग्य ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा उचित अहवाल उलट टपाली प्रशासन विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय येथे पाठविणेत यावा.

| **अ.क्र.** | **मा.नगरसदस्य** | **उपस्थितीत केलेले प्रश्न** | **संबंधित विभाग** |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदेव ढाके | १) रावेत मधील सर्व्हे क्र.१३० व १२० च्या पुर्वेला नाल्याच्या बाजुला असणारा वहिवाटीचा रस्ता नागरीकांना येण्या जाण्यासाठी अपुरा पडत असल्याने तो रस्ता २०५ अंतर्गत १८ एम चा करणे.<br>२) काळेवाडी नदीशेजारी राडारोडा टाकणेत येत आहे याबाबत पर्यावरण विभागाने कार्यवाही करावी.<br>३) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील भोंडवे कॉर्नर, गुरुव्दारा चौक ते आकुर्डी रेल्वे स्टेशन रोड, केशवनगर बस स्टॉप जवळ तसेच मोरया गोसावी स्टेडीयम परिसर, केशवनगर येथील अनधिकृत पत्राशेड/बांधकाम हटविणे | स्थापत्य<br>पर्यावरण |
| २ | मा.राजेंद्र गावडे | १) ओपन प्लॉट असलेल्या जागी अनेक प्रकारे अतिक्रमण केले जाते, याबाबत पर्यावरण विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.<br>२) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१८ मधील चिंचवड गाव व काळेवाडी येथील पवना नदीच्या काठाजवळ काही नागरीक / ठेकेदार राडारोडा आणुन टाकत असल्याने नदीच्या पात्रात अडथळा निर्माण होत असुन संबंधित बाब ही मा.एनजीटी यांचे आदेशाचे उल्लंघन करणारी आहे, तरी अशा प्रकारे राडारोडा आणुन टाकणा-या नागरीकांवर /ठेकेदारांवर आपल्यामार्फत लवकरात लवकर कारवाई करणे | पर्यावरण<br>अतिक्रमण |
| ३ | मा.मोनाताई कुलकर्णी | ५) इंदिरानगरच्या पुढील चौकात विरंगुळा केंद्र करण्यात यावे. | स्थापत्य |